# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक ४ | मुंबई | ऑक्टोबर २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## रामोरावणः।

—**सुहासिनी कीर्तिकर**

मंडळी, हा अंक तुमच्यापर्यंत पोहोचेल, तोवर दसरा उजाडून गेलेला असेल. त्यानंतरच्या दिवाळीच्या, कोजागिरीच्या धामधूमीत तुम्ही बुडून गेलेला असाल. तुमची धामधूम अशीच आनंदाची जावो. पण असे आनंदमयी वातावरण भोवती असताना आपण केवळ परंपराशरण असता कामा नये. उदाहरणार्थ दसराच घ्या. त्यादिवशी काही उत्साही मंडळी एकत्रित येऊन रावण जाळतात. म्हणजे त्याचा पुतळा जाळतात. बरोबर आहे. ती आपली परंपरा आहे. का? तर या दिवशी रामाने रावणाचा वध केला अन् त्याला मुक्ती दिली. मुक्ती? हो! अगदी बरोबर. मुक्तीच. शिक्षा नव्हे! रामायणातील रावण हे खलपात्र वाटते तितके सरळसाधे नाही. अहो!म्हणूनच 'रामायण' हे महाकाव्य ठरते ना! रावणात ९७, ९८, ९९ टक्के चांगुलपण आहे अन् फक्त एखादा टक्का वाईटपण आहे. या वाईटपणाचे प्राक्तन म्हणून त्याचा रामाच्या हातून शेवट झाला. एरव्ही रावण ही फार मोठी, फार महान व्यक्ती होती हो! पण आपण रावण पराभूत झाला म्हणून त्याची अवहेलना करत 'दसरा' साजरा करताना त्याची दहनकृती करून दरवर्षी मानहानी करतो. एखादी व्यक्ती वाईट वागत असली तर आपण असं म्हणतो की ' याच्यात राक्षस संचारलाय.' म्हणजे राक्षसप्रवृत्ती. रावणप्रवृत्ती नव्हे! खरं तर जसे देव, जसा मानव, तसा राक्षस. पूर्वी ज्या जमाती होत्या; त्या जमातीगटांची ही नावं होती. म्हणून तर अजूनही जन्मपत्रिकेत देवगण, मनुष्यगण, राक्षसगण मौजूद आहेत. तेव्हा याच जोडीने गंधर्वगण, वानरगण, जटायू (जाट) गण इत्यादीही जमाती होत्या. त्या त्या जमातीचे इलाखे होते. समाजन्याय आणि विशिष्ट वर्तनशैली होती. तर; अशा राक्षसगणातील रावण हा न्यायप्रिय, लोकहितवादी, सत्शील, आदर्श राजा- सम्राट होता. तो अनेक पैलूसिद्ध होता. खरंच, रामापेक्षाही त्याच्यात अधिक गुण होते; म्हणजे मनुष्यजमातीपेक्षाही अधिक. कसे ते पाहा हं!

तो पुलस्त्य ऋषींचा नातू होता. त्याचे वडील विश्रवा हे वैदिक ऋषी होते. वडिलांकडून रावणाने वेदांचे विस्तृत ज्ञान मिळविले होते. तो श्रेष्ठ मातृभक्त होता. या मातृभक्तीमुळे आई मातीचे शिवलिंग पूजते ही गोष्ट सहन न होऊन त्याने तपश्चर्या केली. महारुद्र महादेवाला प्रसन्न करून घेतले. महादेवाकडून महानागपाश, पाशुपतास्त्र, ब्रह्मास्त्र अशी दिव्यास्त्रे मिळविली. प्रसन्न होऊन महादेवाने त्याला 'ब्रह्मर्षी' ही उच्च पदवी दिली. संस्कृत भाषेचा प्रकाण्डपंडित असलेल्या या परमभक्त रावणाने 'शिवाष्टक' नावाची सुंदर काव्यरचना केली. याशिवाय त्याने मनोवेधक असे 'शिव तांडव स्तोत्रम्' रचले. दक्षिणेकडे ते आजही म्हटले जाते. ज्योतिष आणि आयुर्वेद शास्त्रावर त्याचा असाधारण अधिकार होता. आयुर्वेदाचे विद्यार्थी आजही त्याने लिहिलेला नाडीविज्ञानावरचा ग्रंथ प्रमाण मानतात. धर्मातीत कर्मकांडाचा तो कट्टर पुरस्कर्ता होता. तो स्वतः उत्कृष्ट गायक होता. त्याने वीणा हे वाद्य स्वतः तयार केले होते. म्हणजेच संगीतात त्याला केवळ गती नव्हती; तो या वाद्याचा संशोधक होता. श्री गुरुचरित्रातील सहाव्या अध्यायात रावण श्रीभैरव, मेघ, मालकौशिक, भैरवी, गुर्जरी, ललित, हंसध्वनी, कामोद, सोरटी, भूपाळी, बिलावल, मल्हार, रामकली आदी छत्तीस रागात सामवेद गायन करीत असल्याचा उल्लेख आहे. त्याने निर्माण केलेले 'रावणहत्ता' हे संगीतवाद्य आजही प्रचलीत आहे. त्याच्या रथावर ध्वजचिन्ह म्हणून रूद्रवीणा हे संगीतवाद्य फडकत असे. ते त्याचे मानचिन्ह होते. लढवय्या रावणाला 'रूद्रवीणा' आपल्या झेंड्यावर फडकवावी असे वाटणे हे त्याच्या समतोल रसिकतेचेच लक्षण. शल्यचिकित्सा, खगोलशास्त्र, राजनीती, ज्योतिष्य, आयुर्वेद यांचा त्याचा दांडगा अभ्यास होता. तो सार्वभौम सम्राट होता. देवांबरोबरच्या लढाईत तो जेता ठरला; इतका त्याचा पराक्रम. त्याचे साम्राज्य अति मोठे. बाली, सुंबा, यव मलय हा दक्षिणवर्ती सप्तदीप परिसर; जो आज ऑस्ट्रेलिया, जावा, सुमात्रा, बोर्निओ, मॅडागास्कर, दक्षिण आफ्रिका नावाने ओळखला जातो- त्यावर त्याचे अधिपत्य होते. नर्मदा नदीपर्यंत पसरलेल्या दंडकारण्याचाही तो स्वामी होता. आपल्या 'पुष्पक' विमानातून तो या सर्व प्रदेशांची पाहणी करीत असे. मोराच्या आकाराच्या या विमानाला श्रीलंकेत 'दांडू मोनरा' असे म्हणतात. हे 'दांडू मोनरा' त्याच्या ताफ्यात होते. त्याने नेहमीच सामाजिक न्याय दिला. राजनीती, रणनीतीत तो प्रविण होता. रणभूमीवर तो अनेक अस्त्रे-शस्त्रे अतिकुशलतेने चालवीत असे. जसे की शूल, पट्टीश, प्रास, परिधी, गदा, असि, अंकुश, दंड, धनुष, परशु, मुदगर, मिन्दीपाल, तोमर, कुंटा, शंकू, भृशुंडी, त्रिशूल, खद्रा, वज्र, फरसा इत्यादी. त्याच्याजवळ धनुर्विद्या होती अन् कर्णीबाण, लीप्रबाण, बस्तीक बाण, सूची बाण, नलिक बाण, नाराच बाण, अंजलीक बाण, सर्पमुखी बाण, अग्नीबाण, नागपाश बाण, जिदम बाण इत्यादी अनेक बाण त्याच्या संग्रही होते. तो कलावंतांचा आश्रयदाता होता. त्याची राक्षस जमातीची संस्कृती होती 'रक्ष'- म्हणजे रक्षण करणारी. या संस्कृतीत तो उच्चपदी सन्मानित होता. आपल्या प्रजेसाठी तो सदैव तत्परतेने हितरक्षी होता. त्याने आपल्या लंका या राजधानीत सुव्यवस्था ठेवली होती. सुवर्णचलन होते तिथे. लंकेच्या प्रजेला ना दैन्य माहीत होते; ना भय. या लंकेत विद्युतद्वीप, वातनौका (शिडाच्या बोटी), अग्नीरथ होते. इतकी भौतिक प्रगती असल्यामुळे त्याच्या सैन्यात उन्हाट यंत्रे (तोफा), शताग्नी, विमाने होती. नागास्त्र, अग्निअस्त्र, क्षेपणास्त्र आणि बॉम्ब यांचा शोध लावणारा रावण हा या पृथ्वीतलावरील पहिला मोठा योद्धा होता असे कँडी येथील संग्रहालय सांगते. या संग्रहालयात रावणाचा राष्ट्रध्वज आहे. त्याच्या वायूसेनेत पुष्पक विमानाबरोबरच धानुमोनरा, दंडमोनरा ही विमाने होती. नातल, वरीयापोला, महियांगवा या ठिकाणी रावणसेनेचे विमानतळ होते. विमान दुरुस्तीचा कारखाना गुरू लूपोटा येथे होता. तर अमृतकाली येथे जलसेनेचे प्रमुख केंद्र होते. दिग्गण, जनतू, दंष्ट व मकर हे स्थापत्यविशारद त्याच्या पदरी होते. (जनतू हा वायूयानाचा तज्ञ), ('दिग्गण'चे पुढे 'दिग्गज' असे रूप होऊन आजही आपण 'दिग्गज' हे विशेषण वापरतो. 'मकर'चा पुढे महाभारतात उल्लेख आहे आणि ध्वजचिन्ह म्हणून 'मकरध्वज' विराजमान झाले.) रावणाची लंकेत प्रगत अशी वेधशाळा होती.

पर्यावरणाबाबत तो अतिशय जागरूक होता. (आपण आज आहोत का?) वनराई उभारणे, पक्षीकुंज निर्माण करणे हा त्याचा छंद होता. त्याच्या भावाने म्हणजे कुबेराने 'अशोकवन' वाटिका उभारली होती. (कुबेर आपण देवांचा अर्थमंत्री म्हणून आजही धनवान मानतो.) रामरावण युद्ध झाले तेव्हा लक्ष्मणाला राजनीती त्यानेच शिकवली अन् त्याला मूर्च्छा आल्यावर लागणारी वनौषधी रावणानेच लावली होती! गंमत पाहा. रावण जन्माने ब्राह्मण, पराक्रमाने क्षत्रिय आणि वृत्तीने असूर होता. आर्यसंस्कृतीशी रक्षसंस्कृतीचे बखेडे झाले तेव्हा ही वृत्ती बळावली असे दिसते. आर्यसंस्कृतीत दंडित वा बहिष्कृत लोकांना दंडकारण्यात पाठवले जाई. हे दंडकारण्य रावणाचे होते. म्हणून मग रावणाचे सैनिक आणि दंडकारण्यातील अगस्ती मुनींचे चेले यांच्यात सदैव चकमक होई. आजच्या भारतात उत्तर सीमेवर चीन, तिबेटची माणसे घुसखोरी करतात. 'तावांग' आपला होता. ६२च्या युद्धात तो चीनचा झाला. कैलास पर्वत आपला होता. आज कैलासयात्रा करणाऱ्याला दुदैवाने चीनचा परवाना घ्यावा लागतो. तसेच त्याकाळी दंडकारण्य या प्रदेशाविषयी होत होते. यात होणाऱ्या चकमकी या आर्य आणि राक्षस या दोन संस्कृतीच्या होत्या. शेवटी युद्धे पेटली; त्याला निमित्त झाले सीताहरण. अशावेळी रामाने

(पान २ कॉलम १ वर)

(पान १ कॉलम ४ वरून)

रावणाशी संघर्ष उभा करताना जणू राजनीतीचा आश्रय घेत कूटनीती, कपटनीती वापरली.

राम खूप गुणी होता. त्याचे आपण भक्त आहोत. एकवचनी, एकपत्नी असा हा राम रावणासारखाच पितृभक्त, गुणी राज्यकर्ता, प्रजाहितदक्ष होता. पण रावणाचे प्राक्तन म्हणून रामही लबाडीने वागला. निष्पाप मनाने विवाहाचा प्रस्ताव घेऊन दंडकारण्यात आलेल्या शुर्पणखेच्या भावनांचा उपहास त्याने केला. कुठे होते तेव्हा त्याचे स्त्रीदाक्षिण्य? शिवाय ज्या रामासाठी लक्ष्मण उर्मिलेला अयोध्येत सोडून वनवासात आला होता त्या लक्ष्मणाच्या मागे तिचे लचांड लावण्यासाठी बंधू लक्ष्मण अविवाहित असल्याचे रामाने त्या शुर्पणखेला सांगितले. हाच का सत्यवचनी राम? मग तिला नाक, कान छेदून विद्रूप करण्याची शिक्षा भोगावी लागली. राक्षस संस्कृतीतली ही शुर्पणखा बलाढ्य रावणाची बहीण होती. रावणाने मग का स्वस्थ बसावे? पुढेही कुठलीही ओळख वा संघर्ष नसताना रामाने वालीचा अन्यायाने वध केला. एका तपाचरण करणाऱ्या शंबुकाची हत्या केली. रावणाचा मेघनाथ पूजाविधी करीत असताना नि:शस्त्र होता. अशावेळी रामाने त्याचा वध करण्याची अनुज्ञा लक्ष्मणाला दिली. हे कोणत्या युद्धनीतीत बसणारे होते? आपण 'रामबाण' म्हणून ह्या रामाच्या जन्माचा जल्लोष करतो, आनंद असला जीवनात की 'जगण्यात राम आहे' असं म्हणतो. रामभक्तीचा डांगोरा पिटीत 'रामजन्मभूमी'चे राजकारण करतो, सीतेचा तिच्या गरोदर अवस्थेत त्याग करणाऱ्या रामाचा राजा म्हणून गौरव करतो. बाबा आमटे यांची एक कविता आहे. (त्यांच्या कवितासंग्रहाचे नाव आहे 'ज्वाला आणि फुले!') त्यात ते म्हणतात की, आपण 'रामराज्य आले पाहिजे'

रामराज्य आले पाहिजे'चा नारा लगावतो;

पण रामराज्य आले तेव्हा

सीतेला भूमीगत व्हावे लागले!'

सध्याच्या तथाकथित प्रगत रामराज्यात अशा कितीतरी 'सीता' जमिनीत गाडल्या जाताहेत, मातीमोल होताहेत. तरीसुद्धा आपली लोकशाही म्हणजे 'रामराज्य!'. पण 'रावणराज्य' नाही! रावणाचे 'रा-वन' राज्य ही कळसाध्याय असलेली राजशाही होती. सीतापहरण केल्यावरही रावणाने तिचा उपभोग घेतला नाही. खरेतर तिचा बलपूर्वक उपभोग घेण्याचा सल्ला अमात्य महापार्श्वने रावणाला दिला होता, पण विश्वविजयी, शक्तीसंपन्न रावणाने तो सल्ला अव्हेरला! 'परस्त्रीचा बलात्काराने उपभोग घेणे ही आपली संस्कृती नाही' असे त्याने ठणकावून सांगितले. आज असे रावण हवे आहेतच ना? खरे तर; असा बलाकार करणे हा राक्षसधर्म होता; पण नाही, त्याने सीतेला वचन दिले-

स्वधर्मो राक्षसां भीरू सर्वथैव न संशय:।
नमनं व परस्त्रीणी हरणं सम्प्रमथ्य वा।।
एवं चैदत् आकामां तु न त्यां स्प्रक्ष्यामि मैथिली।
कामं काम: शरीरे में यथाकामं प्रवर्ततम।।

(-रामायण-सुंदरकांड)

'तुझ्या इच्छेविरुद्ध मी तुला कधीही स्पर्श करणार नाही' असे प्रसंगी स्वत:च्या राक्षसधर्माविरुद्ध जाऊन तो सीतेला वचन देतो. किती चारित्र्यवान मोठेपण! त्याला पाच बायका. मंदोदरी, विलासिनी, सुभद्रा, मदनसेना व चंद्रावती. या राण्यांवर त्याचे निष्ठ प्रेम. मंदोदरीही पंचपतिव्रतांमध्ये मोडतेच. 'सीतातारा मंदोदरीच...' अशा पंचकन्या पातिव्रत्याचा अमर इतिहास आहेत. रावण किती मर्यादा पाळत आहे त्याचे हे उदाहरण. पण आपण रामाचे एक पत्नीव्रत वाखाणतो. सीतात्यागाला उदात्त रूप देतो. रावणाचे चारित्र्य दिसत नाही आपल्याला. शेवटी रामाबरोबरचे युद्ध हरल्यावर रावणाने त्याला विनंती केली तीही महत्त्वाची. वीरगती पावलेले आपले योद्धे, स्वकीय, बांधव यांचे रीतसर अंत्यसंस्कार करण्यासाठी त्याने रामाला सात दिवस युद्धविराम करण्याची विनंती केली. स्वत:चा विचार नाही केला त्याने. तो गेल्यावरही त्याच्या सर्व राक्षसस्त्रियांनी त्याच्याबरोबर सहगमन केले; ही त्यांची नैतिकता होती. त्या स्त्रिया वर्चस्व गाजविणाऱ्या आर्य संस्कृतीत नाही आल्या!.

रावणाला आणखी विकृत आपण दाखवतो आणि दसऱ्याला त्याची दहा तोंडे जाळतो. त्याची प्रत्यक्षात दहा मस्तके कोणती होती? महापराक्रमी विजयी सम्राट, रणधुरंधर, रक्ष संस्कृतीचा समर्थक, शिवभक्त, संस्कृत भाषेचा प्रकाण्ड पंडित, श्रेष्ठ कवी, लोकप्रिय नेता, अनेकविध दिव्यास्त्रांचा मालक, विविध कलांचा ज्ञाता आणि भोक्ता, प्रजाहितदक्ष कुशल प्रशासक ही ती दहा तोंडे! आजही आपल्याला ह्या दहा तोंडांची राजकीय प्रशासकांत गरज आहे. ही तोंडे असावीत म्हणून 'हजारे' प्रयत्न होताहेत. मात्र अतिशय दुबळे! वरील दहा तोंडांचा रावण आज नेता म्हणून हवा आहे. मग श्रद्धेवर आधारित परंपरा पालन करून भले आज आपण दहातोंडी रावणाचे दसऱ्याला दहन करत असू. 'श्रद्धेवर आधारित' म्हटलं का मी? अरे! की अंधश्रद्धेवर आधारित?

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यात एक अतिशय पुसट रेषा असते. जशी रामाला मोठे आणि रावणाला 'खोटे' समजण्यात ती आपण उभी केली. परंपरापालन अंधश्रद्धेतूनच होत असते सहसा. एकेकाळी समाजधारणेतून तयार झालेले यम वा नियम पुढे सश्रद्ध मनाने चालू ठेवले जातात. काळ पुढे गेला तरी परंपरा चालूच राहतात. ह्या 'चालूच' ठेवण्यामागे अंधश्रद्धा तयार होते. यासाठी उदाहरणे अनेक देता येतील. पाहा बरं, आपली एक परंपरा किंवा समज आहे. सुपाचा वारा घेऊ नये. (सूप म्हणजे काय? नव्या पिढीला धान्य पाखडण्याचे सूप माहीत नसण्याचीच शक्यता जास्त! किंवा कदाचित् आदिवासी नृत्य करताना ते हाती धरतही असतील म्हणा!!) आता या परंपरेमागे वा विश्वासामागे कारण काय? मानवप्राणी शेवटी स्मशानात देहनाशासाठी नेल्यानंतर त्या अचेतन देहाला अग्नी दिला जाई. हा अग्नी प्रफुल्लीत होण्यासाठी हाती साधन म्हणून जवळ असलेल्या सुपाने वारा घातला जाई. म्हणून मग जीवंतपणी सुपाचा वारा खाणे अशुभ. आता इलेक्ट्रीक दहनभूमीत सुपाने वारा घालणे कुठे आले? तरीही ही परंपरा वा समजूत कायम. म्हणजे आज सुपाचा वारा घेणे अशुभ मानणे ही अंधश्रद्धाच झाली की नाही?

तीच गोष्ट फुलं माळण्याची. सुवासिनी सौभाग्यचिन्ह म्हणून फुलं माळतात. सर्व प्रकारची. सुगंधी, रानटी, मौसमी, कधीकधी कृत्रिमसुद्धा. (आशा भोसले अशा कृत्रिम फुलानेही किती दिमाखदार दिसते!) पण सौभाग्यवती कधीही जास्वंदीचे फूल माळत नाही. ते गणपतीला वाहिले जाते. त्या फुलांचा रंग सुंदर, रचना आकर्षक. आकार मोहक व मोठा, इतरांच्या तुलनेत हे फूल अधिक टिकाऊ. तसे सहज उपलब्धही. पण ते देवाला चालते. बायकांना नाही. का? तर परंपरा. अहो, एकेकाळी समाजात अतिमोठ्या गुन्ह्यांना मृत्यूदंड असे; तेव्हा त्या गुन्हेगाराची धिंड काढली जाई. त्याला गाढवावर बसवून त्याच्या गळ्यात करवीर-जास्वंदीच्या माळा घालून गावभर फिरवले जाई व मग मृत्यूदंड दिला जाई. (करवीर-जास्वंदी; म्हणजे बघा- आजचे 'फ्लुरोसंट कलर्स'!) आता या फुलाचे साहचर्य तेथे जोडले गेल्यामुळे ती परंपरा तयार झाली की सालस माणसानं करवीर (पिवळ्या रंगाची बिट्टीची फुले), जास्वंद (जपा) घालू नये. तेव्हा ठीक होतं हो! पण आज अनेक देशातून फाशीची शिक्षाच मानवतावादातून बाद झाली आहे. आपल्याकडे आहे; पण त्या गुन्हेगाराची अशी धिंड काढली जात नाही. मात्र तरीही ही जास्वंद न माळण्याची परंपरा मात्र चालू. हीच ती अंधश्रद्धा. अशा कालबाह्य झालेल्या अनेक परंपरागत गोष्टींबद्दल आपल्याला पाहाता येईल. म्हणजे शुभअशुभातून आधीची ती परंपरा आणि परंपरेचे पालन करणारी ती आजची अंधश्रद्धा. दसऱ्याच्या रावणदहनाबरोबरीने अशा अंधश्रद्धांचे कायमचे दहन आपण कधी करणार?

वर दिलेली अंधश्रद्धेची उदाहरणे तशी कुणाचे कोठलेच नुकसान करणारी नाहीत. त्यामुळे अशा प्रकारच्या अंधश्रद्धा चालू राहिल्या तरी एकवेळ चालेल हो! पण काही मात्र आपल्या पायावरच दगड मारून घेणाऱ्या आहेत; किंवा मानवाच्या विकसित अवस्थेला प्रश्न करणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ, पूर्वी राज्ये चालविणारी राजांची परंपरा होती. राम, रावण आपण सुरुवातीला पाहिलेच. ही परंपरा त्या त्या राजांची घराणी निर्माण करीत. अकबर राजाची घराणेशाही पाहता येते. रघुराजाचे इश्वाकू घराणे होते. चालुक्य घराणे होते. पुढे ही राज्यशाही बंद, लयाला गेली. संस्थाने खालसा झाली. भारत हे सर्वात मोठे लोकशाही मानले जाते. पण आज चित्र असे आहे की ह्या आदर्श लोकशाहीतही अनेकजण अंधश्रद्धा घेऊन मोठ्या व्यक्तींची घराणेशाही मानतात. नेहरु घराणे त्यातले एक. जवाहरलाल, इंदिरा, राजीव, सोनिया अन् आता राहुल... एक अखंड सश्रद्ध शृंखला लोकशाहीवर राज्य करते. याला कारण 'राजा हा देव' ही पूर्वीची श्रद्धा आजही खेडोपाडी आहे.

अशा अंधश्रद्धेचा रावण आज जाळायचा असेल तर ज्यांच्या हाती लोकांची मानसिकता आदर्शवत घडविण्याची ताकद आहे; त्यांनी सजग राहून आपले आचरण सश्रद्धतेला धक्का न लावता नीतिमान आदर्श ठेवले पाहिजे. एक माझ्या व्यवसायातले अगदी साधेसे उदाहरण देते. मी चांगले शिकवते अन् विद्यार्थी मला मनापासून मानतात; असं समजा. समजाच हं. (नाही समजलात; तर 'ईडा पिडा'गेली!) समजा मी वर्गात गेल्यावर समोरच्या टेबलाला हात लावून कपाळाकडे रोजच्या रोज नेला; तर एखाद्याच्या मनात सहजपणे येईल- बाई वर्गात आल्यावर टेबलाला नमस्कार करतात. म्हणूनच त्यांचे शिकवणे चांगले होते. हे मनात आलेले त्याने इतरांकडे व्यक्त केले की हळुहळू कुणी ना कुणीतरी त्या टेबलाला स्पर्श करीत हात कपाळाकडे नेणं सुरू करील. ना दोष टेबलाचा, ना माझ्या खुळ्या सवयीचा. कुणाच्यातरी मनात आलेल्या शिकवणे अन् स्पर्श करणे यांच्या साहचर्याचा. मग काय? एकानं सुरू केलेली ती कृती विद्याजगात अंधश्रद्धा ठरेल. अंधश्रद्धा अशी चांगल्या श्रद्धेचा हात हातात घेऊन अनेकवेळा भाबडेपणाने वाट चालत असते. पण ती एकदा सर्वमान्य झाली की ती अभेद्य होते. सामान्यांच्या भाबड्या जीवनात तिला छेदणे प्रतिष्ठेचा प्रश्न होतो. मग सुरू होते राम-रावणाची लढाई.

या प्रतिष्ठेच्या प्रश्नापायीच नरेंद्र दाभोळकरांचा बळी गेला. तरी अजूनही कसं; सारं कसं शांत शांत! मित्रहो, आपण दसरा दिवाळी आनंदाने साजरी करताना

(पान ३ कॉलम ४ वर)

लेखांक-१०

## फुलता नलिनी दल

# मटकी सम्हालो

— नलिनी तळपदे

'गोविंदा आला रे ऽ आला. एक दोन तीन चार...' असं म्हणत एकमेकांच्या गळ्यात हात टाकून फिरणारे गोविंदा, त्यांच्यामागून कृष्णजन्मापासून कंसवधापर्यंत श्रीकृष्णाच्या आयुष्यातील प्रसंग चित्रित करणारे चित्ररथ-

पूर्वी गोकुळाष्टमी आली की हे दृष्य रस्त्यारस्त्यावर दिसायचं. आता ते कालातीत झालं आहे. पूर्वी गुण्यागोविंदाने नाचणारे गोविंदा एकमेकांशी स्पर्धा करून आपला झोका उंच उंच नेण्याच्या मागे लागले आहेत.

आपल्या बाळमुखातून यशोदामाईला विश्वरूपदर्शन देणारा, बाळलीलांनी गोकुळाला वेड लावणारा, गवळणींच्या घरी जाऊन उंच टांगलेल्या शिंक्यातलं दही लोणी खाणारा हा माखनचोर, त्याचा जन्मदिवस थाटामाटात साजरा करताना त्याच्या आवडत्या दही, लोण्याला विसरून कसं चालेल? गोकुळअष्टमीचा दिवस त्यासाठीच तर राखून ठेवलेला असतो. तोच हा गोपाळकाला. त्यादिवशी दहीहंडीला अनन्यसाधारण महत्त्व दिलं जातं.

अलीकडे या हंड्या दहीदुधाऐवजी हजारो, लाखो रुपयांच्या थैल्यांनी ओतप्रोत भरलेल्या असतात. त्यासाठी अटीतटीच्या, जीवघेण्या स्पर्धा लावल्या जातात. पूर्वी निव्वळ मनोरंजन म्हणून हा खेळ खेळला जायचा. आता त्याचं बाजारीकरण झालं आहे. काही जुनी जाणती अनुभवी तर काही नवी, अजाणती, अननुभवी गोविंदापथकं, त्यातच आता महिलांचीही पथकं सामील होताहेत. एकमेकावर कुरघोडी करणाऱ्या या स्पर्धा आता अटीतटीपेक्षा जीवघेण्या ठरत आहेत. कारण त्याला आलेला राजकीय रंग. नेहमीप्रमाणे या खेळातही राजकारण्यांनी मोठमोठ्या रकमेची आमीषं दाखवून या गोविंदांना भुलवून आपलं घोडं पुढे दामटलं आहे.

सध्या नऊ थरांपर्यंत गेलेली हंडी दहाव्या थरापर्यंत नेण्यासाठी भलंमोठं आमीष दाखवलं गेलं. अर्थातच ते होऊ शकलं नाही. याच कारणास्तव अति उंच मानवी मनोऱ्याच्या निषेधार्थ यावर्षी एका गोविंदा पथकानं मात्र शहाणपणानं माघार घेतली. ह्यात ही पैशाची प्रलोभनं दाखवणाऱ्या बड्या धेंडांचा खेळ होतो; पण जीव जातो या स्पर्धेत जीवाची बाजी लावून खेळणाऱ्या गोविंदांचा. स्वतःच्या मनोरंजनासाठी ही मंडळी दही हंडीच्या नवव्या दहाव्याच काय; त्यापलीकडे कोणत्याही थराला जाऊ शकतात. तरी प्रसिद्धी माध्यमांकडून गोविंदा पथकांना वेळोवेळी सावधगिरीचे इशारे दिले जातात.

उंचावरून पडल्यामुळे कितीजणांना दुखापतीशी सामना करावा लागतो. कित्येकजण जीवानिशी जातात. काहींना अपंगत्व येतं. त्यामुळे रंगाचा बेरंग होऊन कित्येक घरांवर कायमचं दुःखाचं सावट पसरतं. पुन्हा या दुःखावर नुकसानभरपाईची फुंकरही न घालता पैशांच्या भूलभुलैयात वेगवेगळ्या पथकांना गुंतवून हे राजकीय नेते आणि आयोजक हात झटकून मोकळे होतात. पण टाळी एका हातानं वाजत नाही हेही तितकंच खरं.

दिवसेंदिवस ही गोविंदापथकंही बेतालपणानं हैदोस घालताना दिसतात. काही गोविंदांनी तर महिलांची छेड काढत उत्सव साजरा केला. आपली घागर बक्षिसांनी भरण्यासाठी मिळेल त्या वाहनांनी भरधाव वेगाने जाऊन काही गोविंदांनी वाहतुकीच्या व सामाजिक नियमांचंही उल्लंघन केले. काही गोविंदांनी महिलांवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिकच्या पिशव्या फेकून असभ्यतेचं दर्शन घडवलं. इतकंच नव्हे तर खासगी गाड्या, बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांनाही असे त्रासदायक अनुभव आल्याच्या तक्रारी आहेत.

एकूणच दिवसेंदिवस परिस्थिती हाताबाहेर जात आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहिला नाही. प्रत्येकजण स्वतःच्या धुंदीत मनमानी करत जगतो आहे. साम, दाम, दंड, भेद कशालाही न जुमानणारी ही हौस म्हणायची की मनमानी? उत्सवाच्या नावाखाली सगळे कायदेकानून गुंडाळले जात आहेत. मुंबई विद्रूप करणाऱ्या फलकबाजीला आळा घालायचे आदेश दिल्यानंतर पालिकेने मुंबईतील फलक काढून टाकले होते, पण दहीहंडीचं निमित्त साधून उत्साही राजकीय नेत्यांनी पुन्हा फलक झळकावून मुंबई विद्रूप केली व न्यायालयाचा अवमान केला, तसेच आवाजाच्या मर्यादेचेही ठिकठिकाणी उल्लंघन केलं गेलं.

थोडक्यात, या सर्व प्रकारांनी उत्सवाचा हुरूप, आनंद, उत्साह बाजूला राहून त्यांच्या वागण्याचं गालबोट गोपाळकाल्याला लागलं आहे. त्यातील असंवेदनांचा कळस म्हणजे मनोऱ्याच्या सर्वात उंच थरावर असणारी चिमुकली मुलं. मनोरा कोसळल्यावर खाली पडलेल्या त्या कोवळ्या शरीराशी कुणाचा संबंध नसल्यासारखी यांना, पर्यायानं माणुसकीला पायदळी तुडवून उत्सव साजरा केला जातो. जखमींना नेण्यासाठी रुग्णवाहिका ठेवल्या की आपला कार्यभाग संपला असं आयोजकांना वाटत असावं. असे गंभीर प्रकार घडू नयेत याची काळजी घेणं किंवा या प्रसंगातून निभावण्यासाठी काही तरतुदी करणं, याची आवश्यकताच आयोजकांच्या व दौलतजादा करणाऱ्या राजकारण्यांच्या लक्षात येत नाही.

यावर्षीच्या गोकुळाष्टमीला दहीहंडी फोडतांना मनोरा कोसळल्यामुळे हंडीला लटकलेला गोविंदाचा लोकसत्तेत छापून आलेला फोटो पाहिला आणि जीवाचा थरकाप झाला. प्रत्यक्ष ही घटना पाहणाऱ्या कितीजणांच्या काळजाचे ठोके चुकले असतील देव जाणे! पुढे त्या गोविंदाचं काय झालं माहीत नाही. पण प्रसंग बाका होता एवढं मात्र निश्चित.

खरं तर या जीवघेण्या दहीहंडीच्या उंचीवर निर्बंध घालायला हवेत. लाखो रुपयांची बक्षिसे, तारेतारकांची हजेरी यामुळे दहीहंडी लवकर फुटू नये यासाठी ती अधिकाधिक उंचीवर नेण्याचे आयोजकांचे प्रयत्न असतात. पण याला कुठेतरी मर्यादा घालायला हवी. कारण दिवसेंदिवस या उत्सवात गंभीर जखमी होणाऱ्या गोविंदांचं प्रमाण वाढत आहे. शिवाय त्यात मृत्यूमुखी पडलेल्यांची, कायमचे अपंगत्व आलेल्यांची जबाबदारीही आयोजक किंवा सरकार घेत नाही. ती घेऊन त्यांच्यासाठी आवश्यक त्य सुविधा, तरतुदी केल्या पाहिजेत.

एकंदरीत आयुष्य पणाला लावून साजरा केलेला हा उत्सव ना धर्माचा, ना रूढीपरंपरेचा, ना आनंदाचा, ना हौसेचा तर; बेजबाबदार आयोजकांच्या, पैशाच्या चुराडा करणाऱ्या मस्तवाल राजकारण्यांच्या मनमानीपणाचा हा गोपाळकाला म्हणजे अभूतपूर्व सोहळा आहे.

जाता जाता या सर्वांना एक धोक्याचा इशारा द्यावासा वाटतो. अहो, घराची अब्रू वेशीवर टांगू नये असं म्हणतात. तुम्ही तर चक्क घरातलं दह्यादुधाचं शिंकाळं वेशीवर नेऊन टांगलंत. तेही त्यातला मूळ गोडवा घालवून अशा विकृत स्वरूपात. का नाही राग येणार श्रीकृष्णाला त्याच्या आवडत्या दहीहंडीची अशी विटंबना केल्यावर? आणि राग आल्यावर भगवान श्रीकृष्ण काय करतात माहीत आहे ना? ते सख्ख्या मामाचा, कंसाचा वध करतात. सख्ख्या आतेभावाचा- शिशुपालाचा शिरच्छेद करतात. तुम्ही तर त्यांचे कुणीच लागत नाही. त्याच्याविषयी तुमच्या मनात भक्तिभावही नाही. कारण पैशाशिवाय कुठल्याच परमेश्वराला तुम्ही मानत नाही. म्हणूनच शंभर अपराध भरण्याआधी विनम्रभावानं त्यांना शरण जा. नाहीतर- नाहीतर त्यांचं सुदर्शन चक्र आहेच तयार तुमच्या मस्तकाचा वेध घ्यायला.

✳

---

(पान २ कॉलम ४ वरून)

परंपरेमागची तर्कपरंपरा पारखून घेऊ या. राम अन् रावण; दोघातल्या वाईटांचा त्याग करू या. जय रावण! जय जय, जय जय राम!!

**(वाचकांसाठी टीप**:- ऑक्टोबरचा अंक हा अधिकचा अंक आहे. नेहमी दिवाळी अंकानंतर दुसऱ्या महिन्यात अंक निघत नाही. मात्र नवीन कायद्याप्रमाणे दर महिन्याला अंक प्रकाशित व्हायलाच हवा. म्हणून अधिकचा हा दिवाळीपूर्व अंक. नेहमीची परंपरा मोडून या अंकात काही बदल केले आहेत. वाचक 'प्रभुतरुणा'बाबत अंधश्रद्ध नसल्याकारणाने हा बदल ते सश्रद्धतेने/ सप्रेम स्वीकारतील अशी रास्त अपेक्षा.

-संपादक)

✳

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# व्यक्ती तितक्या प्रकृती!

**-अजित मानकर**

आयुष्याच्या दीर्घ प्रवासात प्रत्येकासच अनेक माणसांचा व प्रसंगांचा अनुभव येत असतो. हा अनुभव इतका प्रदीर्घ व मजेशीर असतो की लिहावयाचे म्हटल्यास एक मोठा ग्रंथही त्यातून निर्माण होईल.

आज मी आपणास माझ्या केसरीबरोबर केलेल्या युरोप प्रवासाचे ५ वर्षांपूर्वीचे अनुभव सांगतो. आम्ही सर्वप्रथम माद्रीद ह्या स्पेनमधील शहरात एके संध्याकाळी दाखल झालो. दुसरे दिवशी शहराचा फेरफटका मारण्यासाठी सर्व मंडळी सकाळी नास्ता उरकून ८ वाजता बसची वाट पाहत लॉबीमध्ये बसली होती. इतक्यात आमच्यातीलच एक श्री. कासार धावत धावत लॉबीत आले व त्यांनी मॅनेजरला आपल्या खोलीत चोरी झाल्याचे सांगितले व संशय खोली साफ करणाऱ्या गरोदर बाईवर बोलून दाखवला. लगेचच पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिस ५ मिनिटांत आले आणि पुढील ५ मिनिटांतच निघूनही गेले, कारण संशयित बाई गरोदर होती व स्पॅनीश कायद्याप्रमाणे गरोदर स्त्रीला त्या देशात संपूर्ण अभय आहे.

श्री. कासार ह्यांनी स्वत:बरोबर अमेरिकन डॉलर ५०००/- इतकी मोठी रक्कम प्रवासासाठी आणली होती व ती सर्व टूरच्या पहिल्याच दिवशी लंपास करण्यात आली होती. कुणीही गृहस्थ ह्या धक्क्याने पार हादरून गेला असता. कारण ही रक्कम भारतीय चलनात रुपये २०००००/- इतकी प्रचंड ठरत होती. आम्ही सर्व सहप्रवासी श्री. कासार ह्यांना सहानुभूती दाखविण्यास जमलो. तेव्हा श्री. कासारांनी आमचीच समजूत काढली. त्यांच्या म्हणण्यानुसार त्या स्त्रीने कासारांचे फक्त पैसेच चोरले होते. नशीब तर नाहीना चोरले? आणि शिवाय पासपोर्ट व क्रेडिट कार्डस् न चोरून तिने त्यांच्यावर उपकारच केले होते.

हा येवढा मोठा धक्का ह्या गृहस्थाने असा हसत हसत पचवला होता. मागाहून कळले की हे श्री. कासार स्वत: जातीने कासार असून व्यवसायाने पण कासार होते. त्यांची वसई विरारला मोठी फौंड्री असून महिंद्र जीप कंपनीचे इंजिन कास्टिंग बनविण्याचे कंत्राट त्यांच्याकडे होते. मी मनात समजून गेलो की श्री लक्ष्मीदेवीचा प्रत्यक्ष वरदहस्त असणारा गृहस्थच इतक्या थंडपणे हा धक्का पचवू शकतो. माझ्यासारखा सामान्य माणूस कोणी त्यांच्याजागी असता तर केव्हाच कोलमडला असता.

गृहस्थ येवढा रांगडा व मजेशीर की जेव्हा आम्ही ॲमस्टरडॅम शहरात फिरत होतो तेव्हा संध्याकाळी आम्हास फिरण्यासाठी मोकळा वेळ होता. आमच्या टूर गाईडने सुचवले की इथे जवळच जगातील सर्वात प्रथम रेड-लाईट स्ट्रीट आहे. वाटल्यास आपण तिथे फेरफटका मारू शकता. आमचा सर्व ग्रुप तिथे जाण्यास तयार झाला. श्री. कासारदेखील बायकोस हॉटेलमध्ये ठेवून आमच्याबरोबर आले. आपणास ठाऊकच असेल की तेथे वेश्याव्यवसाय कायद्याच्या संरक्षणात विशेष काळजी घेऊन चालविण्यास अनुमती आहे. तिथे काम करणाऱ्या स्त्रीया ह्या सर्वपरीने नटून सजून काचेच्या खिडक्यांच्या आत उभ्या असतात जेणेकरून रस्त्यावरून फिरणारी गिऱ्हाईके आकृष्ट होऊन आत जाऊ शकतात.

आमचे श्री. कासार कॅमेरा सरसावून ह्या स्त्रीयांचे फोटो काढण्याच्या विचारात होते. मी त्यांना समजाविले की असे आपण करू नका. मात्र त्यांनी काही आमचे ऐकले नाही व ग्रूपला सोडून मागेच घुटमळत राहिले. आम्ही थोडे पुढे गेलो. इतक्यात मागून गलका ऐकू आला. बाऊन्सर्सनी (तिथले टगे) श्री. कासार यांची बकोटी धरून त्यांना उचलले होते. व तात्काळ आमच्यापाशी आणून त्यांना सोडून देण्यात आले. वरती दोन गोष्टीही त्या टग्यांनी सुनावल्या. त्या सौम्य मराठीत व शिव्या सोडून ह्या अर्थाच्या होत्या.

'तू इंडियन फक्त सांबार चावल खा आणि आत न येताच बाहेरून फुकट फोटो काढत बस, चल चालू पड येथून.'

नशिबाने काहीही मारहाण त्यांना करण्यात आली नाही. मी त्यांना परत सांगितले की कशाला तुम्ही हे उद्योग करायला गेलात? आम्ही तुम्हाला असे फोटो न काढण्याबद्दल बजावले होते. पण काही फरक नाही. गडी मस्तपैकी हसला व पुढचा फेरफटका मारण्यासाठी कपडे झटकून तयार झाला.

प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये एअरलाईनच्या नियमानुसार बॅगेज् जास्त झाल्यामुळे त्यांना रु. १०,००० जादा चार्ज भरावा लागला, इतकी प्रचंड खरेदी त्यांनी शेवटपर्यंत युरोपमध्ये केली होती. आणि तेही सुरुवातीलाच सर्व पैसे गेले असताना. खरोखरच मजेशीर व रांगडे असे त्यांचे व्यक्तिमत्व मला भावले.

ह्याच प्रवासात आमच्याबरोबर श्री व श्रीमती मिरचंदानी ही पुण्याची एक जोडी होती. प्रत्येक दिवशी सकाळी बस सुरू होताना बसमध्ये या युगुलाची मोठ्या आवाजात 'ओम राधास्वामी' करून झुलेलालची आरती सुरू व्हायची. असे हे godfearing श्रद्धाळू जोडपे. कळले की, ह्या गृहस्थाचे पुण्याला गिफ्ट आर्टिकल्सचे दुकान आहे. हे दांपत्य बेमालूमपणे कुणाच्याही नजरेत न येता संपूर्ण युरोपभर दुकानातून भुरट्या चोऱ्या करत फिरत होते. माझ्या बारीक नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. जेव्हा प्रवासाची लंडनला सांगता झाली तेव्हा संध्याकाळी नियमापेक्षा ३ सुटकेस जास्त होत्या. कदाचित त्यांनी एस्ट्रा बॅगेज्चे पैसे मोजले असावेत असे आम्हास त्यावेळी वाटले. अर्थात सर्वत्र हात मारलेला चोरटा माल त्यात भरला होता हे सांगणे नलगेच!

विमान मुंबईला उतरले आणि दरवाजा उघडताच एक एक करीत प्रवासी संथपणे बाहेर पडत होते. मात्र विमानाच्या दरवाजाबाहेरच अधिकारी वर्गाचा एक जथा उभा असलेला आम्हास दिसला. त्यात कस्टम्स, पोलीस, लष्कर आणि एअर इंडियाचे प्रतिनिधी उभे ठाकले होते.

मी मनात समजून चुकलो की ही सर्व अधिकारी मंडळी मिरचंदानी जोडप्याला आता चोरीचा माल आणल्याबद्दल नक्कीच अटक करणार व सर्वांसमक्ष त्यांचे भांडे फुटणार!

श्री व सौ. मिरचंदानी दरवाजाबाहेर पडताच ह्या सर्व अधिकाऱ्यांनी त्यांना गराडा घातला व दुसरेच एक दांपत्य राजेशाही थाटात जणू एखादा व्हीआयपी चालला आहे असे भासवत Immigration and customs मधून त्यांच्या बॅगा उचलून विनाविलंब चुटकीसरशी बाहेर पडले व सर्व जडजवाहिऱ्यांनिशी ह्या सर्व चोरांनी पुण्याकडे एसी व्हॅनमधून त्वरित प्रयाण केले.

आम्ही मात्र कस्टमच्या लांब रांगेत घाम गाळत उभे असताना आमच्या टूर गाईडने अधिक माहिती पुरविली की एअरइंडियाने लंडन विमानतळावरदेखील खास मेहरनजर करीत मिरचंदानी ह्याचे एस्क्ट्रा बॅग्ज विमानात कुठलेही शुल्क न लावता सामील केले होते.

झाला सर्व प्रकार अगदी थक्क करणाराच होता. इथे चोरांना शिपाईदेखील सामील होते हा निष्कर्ष काढण्यापलीकडे कोण काय करू शकत होते? शेवटी कालाय तस्मै नम:! हेच खरे

अशा अनेक गंमतीजमतीचे गाठोडे अनुभवाने मी जमवलेले आहे. हळुहळू हे गाठोडे मी आपणासमोर सोडणार आहे. आपणही सर्वजण त्याची मजा अनुभवू शकाल!

*

# अशी पाखरे येती

**-जयमती जयपाल तळपदे**

पु. लं.चं 'व्यक्ती आणि वल्ली' वाचता वाचता 'नारायण'वर नजर पडली आणि एकदम आठवण झाली आमच्या सुरेश भाऊजींची. सुरेश कमलाकर जयकर! बरेचजण ज्ञातीत त्यांना ओळखत होते. कारण स्वभाव एकदम बोलघेवडा. माणसांची प्रचंड आवड आणि दुसऱ्यांना मदत करण्याची स्वाभाविक वृत्ती.

सुरेशभाऊजी स्वयंपाक करण्यात हुशार. मांसाहारी वा शाकाहारी कुठलाही पदार्थ ते उत्तम बनवीत. हॉटेलात जाऊन तेथील आवडलेल्या पदार्थांचे ते अगदी शास्त्रज्ञासारखे निरीक्षण करीत. त्यात काय काय पदार्थ (मसाला) आहे येथपासून ते कसे शिजवले आहे, याचा मनातल्या मनात अभ्यास करीत व घरी येऊन तो पदार्थ बनविण्याचा प्रयोग करीत आणि घरातले सारे 'गिनीपिग्ज' असत. पण कसे कोण जाणे; तो पदार्थ हॉटेलसारखा होवो न होवो, चवीला मात्र उत्तम होत असे. वेगवेगळे पदार्थ त्यातही मांसाहारी जास्तच बनविण्याची व लोकांना खाऊ घालण्याची प्रचंड हौस होती. आपण आपल्या पोटाच्या हिशेबात खातो, हे त्यांना मान्यच नसे. त्यांचा आग्रह मोडणेसुद्धा जीवावर येई. त्यामुळे गोरेगावला त्यांच्याकडे जेवायला गेलो की, जेवण हमखास जास्तच होई. स्वत:पेक्षा पाहुण्यांच्या जेवणाकडे त्यांचे जास्त लक्ष असे व एखादा ताटातला पदार्थ संपला की आग्रह झालाच समजा!

सुरेशभाऊजींच्या मित्रमंडळात तर ते लाडके होतेच; पण माझ्या मिस्टरांच्या मित्रमंडळातसुद्धा ते आवडत होते. मिस्टरांच्या प्रत्येक पिकनिकमध्ये त्यांचा सहभाग असायचा. तेथेसुद्धा त्यांनी स्वयंपाकातील 'कामगिरी' दाखवलेली असे. काही दिवस ते नोकरीनिमित्त पुण्याला राहत होते. माझ्या मिस्टरांच्या मित्रमंडळाची खंडाळा ट्रीप ठरली. सहसा ही मंडळी जेवण घरीच बनवीत. तर या ट्रीपसाठी आमचे सुरेशभाऊजी पुण्याहून एका मोठ्या रुंद टोपात 'सुरमईचे आटले' करून, व्यवस्थीत पॅकिंग करून, ट्रेनमधून खंडाळ्याला हजर! आता बोला! ऑफिसमध्येसुद्धा ते असे डबे भरून विविध प्रकारचे पदार्थ नेत व त्यांचे सहकारी, भगिनीसुद्धा बोटे चाटून सर्व संपवीत.

(पान ६ कॉलम ३ वर)

लेखांक १०

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

कोणत्याही विषयाचा विचार करताना आढळून येतं की, त्या विषयाला खूप बाजू असतात. आणि प्रत्येक बाजूला खूप कंगोरे आढळतात. त्यामुळे कोणत्याही विषयाचा सर्वंकष विचार केला तरच तो पूर्ण विचार ठरतो. पूर्वी ह्या गोष्टीला साधकबाधक चर्चा म्हणत. नी वक्तृत्व स्पर्धा किंवा परिसंवादाच्या माध्यमातून ह्या विचारांच्या बाजू आणि त्यांचे कंगोरे उलगडत जायचे. अर्थात प्रत्येकाच्या सम्यक् दृष्टीनुसार हे कंगोरे बोलण्यातून व्यक्त व्हावयाचे. लहान असताना एक गोष्ट ऐकली होती- चार आंधळ्यांची गोष्ट. त्यांच्यासमोर एकदा हत्ती आणण्यात आला आणि त्यांना सांगितलं गेलं की, स्पर्श करून हत्तीचं वर्णन करा. एका आंधळ्याचे हात हत्तीच्या पायाजवळ पोहोचले. त्यानं तो पाय चाचपून सांगितलं की, 'हत्ती खांबासारखा असतो.' दुसऱ्याच्या हाताला हत्तीची शेपूट लागली. तो म्हणाला, 'हत्ती जाड दोरीसारखा असतो.' तिसऱ्याच्या हाताला हत्तीचे कान लागले म्हणून तो म्हणाला, 'हत्ती सुपासारखा असतो.' चौथ्यानं एका बाजूनं पाय चाचपायला सुरुवात केली, पण त्याच्या हातात अखंड हत्ती येत नव्हता. त्याचे हात मागच्या शेपटीपासून सुरुवात करून पाय व नंतर पोटाला लागले. पण हत्तीची पाठ त्याच्या हाताला लागेना. तो तसाच चाचपत चालत राहिला. कान त्याच्याही हाताला लागला. पण तेवढ्यावरच वर्णन करायला तो तयार नव्हता. शेवटी हत्तीच्या सोंडेला त्यानं स्पर्श केला. पण तो सारखा म्हणत राहिला की, पूर्ण हत्ती त्याच्या हातात येत नाहीय्. ह्या गोष्टीवरून दोन गोष्टी ठळकपणे लक्षात येतात त्या अशा की त्याची जिज्ञासा खूप होती आणि तो खूप विचारही करीत होता. हे विचार म्हणजेच हत्ती या विषयाच्या बाजू नी शेपटीच्या सुरुवातीनंतर शेवटी त्याच्या हाताला केस लागले, आणि सोंड चाचपताना वरून सुरुवात केली तर तिथं जाड नी शेवटी सोंडेची रुंदी कमी होत गेलेली त्याला कळली- हे त्या विचाराचे कंगोरे.

अर्थात्, ह्या विचारांना आणखी एक परिमाण लाभतं- ते म्हणजे चांगलं नी वाईट. आपलं बोलणं, वागणं ह्या सगळ्या गोष्टींना हे परिमाण लागू होतं. आपल्यावर लहानपणी संस्कार केले जातात की नेहमी चांगलं वागायचं, बोलायचं. वाईट वागायचं नाही. दुसऱ्याचं वाईट करायचंही नाही. याचं महत्त्वाचं एक कारण म्हणजे बूमरँग. पूर्वी हेसुद्धा सांगितलं जायचं की 'जे पेराल ते उगवेल.' वर्तमानाचं भविष्य होताना फक्त हाच परिणाम होत असतो. चांगलं नी वाईट ह्या परिमाणाचा परिणाम म्हणजेच भविष्यकाळ. बूमरँग देवाकडेसुद्धा परत जातं. आपलं चांगलं झालं तर आपण देवाचे आभार मानतो. आपल्या प्रयत्नांना त्यानं सुयश दिलं म्हणून आपण खूष होतो, आणि वाईट झालं तर मात्र देवाला दूषण देत राहतो. देवानं आपल्यालाच वाईट नशीब दिलं असं म्हणतो. म्हणजेच कुठंतरी चांगल्याचं श्रेय आपल्या प्रयत्नांना नी वाईटाचा धनी कायम दुसराच, हीच प्रत्येकाची वृत्ती असते. त्यातून देवाला वाईटाचा धनी करणंही सुटत नाही. आपल्या अपयशाची जबाबदारी स्वत:वर घ्यावयास कोणीही तयार नसतात.

इकडे चांगलं करा नी आयुष्याच्या वाटेवर कधीतरी त्याचं बक्षिस घ्या. आत्ता कुणाचं तरी वाईट करा नी पुढे कधीतरी त्याची जबरदस्त शिक्षा भोगा- हाच तर भगवद्‌गीतेमधला कर्मयोग. देवाने जे आयुष्य, जी आजुबाजूची परिस्थिती आपल्याला दिलीय नी जी भूमिका आपल्या वाट्याला आलीय ती जबाबदारीनं पार पाडणं आपल्याकडून अपेक्षित असतं हे भगवद्‌गीता सांगते. माणसाच्या कर्माप्रमाणे जी बक्षिसं किंवा सजा त्याला मिळतात ती बक्षिसं नी सजा कोणत्या रूपात नी आयुष्याच्या कोणत्या वळणावर येतील ते माहीत नसतं. हे बक्षिस स्पर्धेमधलंच आहे. पण देवानं हे बक्षिस आधी जाहीर केलं नी त्यासाठी माणसांनी त्या स्पर्धेत भाग घेतला अशा स्वरूपाची ही बक्षिसं नसतात. जीवनाची स्पर्धा सततच चालू असते. त्यामुळे आपल्याला कोणत्या चांगल्या कृत्याची, चांगल्या वागण्याबोलण्याची नी चांगल्या कर्तृत्वाची ती बक्षिसं असतात ते आपल्याला कळत नाही. तसंच कोणत्या वाईट कर्माची सजा मिळते तेही कळत नाही. देवाला चांगल्या लोकांचे हाल बघवत नाहीत. पण शंभर निरपराध आणि निष्पाप लोकांना त्रास झाल्याखेरीज शिशुपालाचे शंभर अपराध भरत नाहीत हेच खरं आहे. असा त्रास जेव्हा निरपराधांना होतो तेव्हा ती पूर्वजन्मीच्या पापाची सजा असं आपण म्हणतो. हे शंभर अपराध जर एकाच विवक्षित माणसाच्या बाबतीत घडलेले असतील तर शिशुपालाला होणारी सजा भयंकरच असते.

पण खरंच सगळ्या 'पापां'चं मूळ पूर्वजन्मीच्या कृत्यात आहे का? एखाद्याच्या दृष्टीनं एखादी गोष्ट योग्य असेल तर तीच दुसऱ्यासाठी अयोग्य असू शकते. एकाला न्याय देताना कधीकधी दुसऱ्यावर नकळत अन्याय होतो. त्यावेळी प्रत्येकजण त्याच्या त्याच्या जागी बरोबरच असतो. पण त्याचा एकत्रित परिणाम विचित्र होतो. एक अगदी साधं उदाहरण म्हणजे समजा, तुम्ही लेखन करताय. थोडं लिहून झाल्यानंतर तुमच्या पेनामधलं रिफील संपेल म्हणून तुम्ही दुसरं रिफील काळजीपूर्वक बाजूलाच पण टेबलाच्या कडेला ठेवलंय. ते बघून कुणीतरी ते रिफील काळजीपूर्वक टेबलाच्या कडेपासून ते पडू नये ह्या हेतूनं बरंच आत सरकवतं नी ते लिहिणाऱ्यापासून लांब ठेवतं. जेव्हा तुमचं रिफील संपतं तेव्हा तुम्ही चटकन् बाजूला रिफील शोधता पण प्रत्यक्षात तुम्हाला ते घ्यायला उठून टेबलाच्या मध्यापर्यंत वाकावं लागतं तेव्हा तुमच्या तोंडून वैतागानं शब्द येतात- 'कुणी हलवलं हे रिफील?' ह्यात चूक तुमची दोघांचीही नाही. दोघांचेही हेतू प्रामाणिक, पण परिस्थिती चुकीची असते आणि तुमच्या तोंडून मनातला वैताग बाहेर पडतो ते तुमच्या आत्म्याच्या तळतळाटाचं व्यक्त रूप असतं. अर्थात्, तुमच्या मनात तेव्हा हाच विचार प्रबळ असतो की, दुसऱ्यानं मुद्दाम तुमच्या लेखनात खंड पडावा म्हणूनच रिफील लांब ठेवलं. एवढ्याशा गोष्टीवरून दुसऱ्याला तळतळाट लागावेत ही तुमची इच्छाही नसते. तुम्ही अपशब्दसुद्धा उच्चारत नाही. पण तुमच्या आत्म्याचे तळतळाट जातातच. तसंच वादात कुणा एकाची बाजू घेणं हे दुसऱ्यावर अन्यायकारक ठरतं.

तेच आपलं कुणी चांगलं केलं तर आत्म्याचे आशीर्वाद त्या माणसाला मिळतात. बाहेरून दमून थकून घरी आल्यानंतर घरच्यांपैकी कुणीतरी पुढे केलेल्या थंड पाण्याच्या ग्लासाने हे आशीर्वाद ग्लास पुढे करणाऱ्याला ह्या सेकंदाला मिळून जातात. थँक्यू म्हणायचीही गरज नसते. पाण्याचा पहिला घोट घशाखाली जातानाच एक किंवा अनेक आशीर्वाद तहान भागवणाऱ्याला मिळायला सुरुवात होते. तळतळाट किंवा शाप देणं हे कधीकधी संबंधित माणसाच्या हातातही नसतं नी मनातही नसतं. बुद्धीला तर हे तेव्हा मान्यच नसतं. पण ते काम माणसांच्या नकळत त्यांचे आत्मे करीत असतात. हीच तर असते माणसाच्या पापपुण्यांची देवानं केलेली गुंफण. चांगलं वागण्यानं,चांगलं बोलण्यानं घरात, आयुष्यात प्रसन्नता नी सुयश लाभतं. घरात देवाचे किंवा रुद्राचे मंत्रोच्चार महत्त्वाचे. ते वास्तूत घुमतात आणि सकारात्मकता खेचतात.

मुलांवर संस्कार करताना स्वत:चं उदाहरण चांगल्या गोष्टींच्या संदर्भात पालक तेव्हाच देऊ शकतात जेव्हा ते सुसंस्कृत माणसांसारखंच कायम वागतात. विकृत विचार, विकृत आचार हे संपूर्ण जीवनातच विकृती आणतात. विकृती उपजतच असते की परिस्थितीजन्य ते विकृत लोकच जाणतात. ही विकृती नशीब देतं की ते पूर्वजन्मीचं पाप असतं माहीत नाही. काळ्या करण्या हा वादाचा मुद्दा. पण नकारात्मक वृत्तीचे लोक स्वत:च्या चुकांची जबाबदारी स्वत: न घेता दुसऱ्यांवर खापर फोडतात व काळ्या करण्यांवर दोषाचा ठपका ठेवतात. चांगल्या व निरपराध लोकांच्या बाबतीत जेव्हा अशा करण्या काम करतायत असं म्हटलं जातं तेव्हा ते त्यांचं नशीब म्हणून ह्या काळ्या करण्या त्यावेळी काम करतात. असे लोक डोकं ठेवण्यासाठी दुसऱ्याचा खांदा शोधतात. काहीही चूक न करताही चांगल्या लोकांना वाईट काळ भोगावा लागतो ती देवाची सुखदु:खाची वीण किंवा पूर्वजन्मीचं पाप म्हटलं जातं. पण ते कदाचित् नकळत केलेल्या पापांचं बूमरँग असू शकतं आणि त्यांचं चांगलं होतं तेव्हा नकळत घडलेल्या पुण्याचं बूमरँग असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

विकृत लोक तर अंधश्रद्धा पोसतातच. पण प्रसंगी चांगले लोकही अंधश्रद्धा बाळगू लागतात आणि तथाकथित भोंदूबाबांच्या जाळ्यात सापडतात. मागे मी ज्या अंधश्रद्धा सांगितल्या होत्या त्या क्वचित् प्रमाणातच दुसऱ्याला त्रासदायक ठरतात. पण विकृतांच्या अंधश्रद्धा समाजविघातक ठरतात. त्याचं उदाहरण म्हणजे पैसा किंवा अपत्यप्राप्तीसाठी नरबळी. अगदी लहान बाळांचासुद्धा बळी दिला जातो. मागे टी.व्ही.वर दाखवलं गेलं होतं की भारतात एका ठिकाणी काही महिन्यांच्या तान्ह्या बाळांना मंदिर परिसरातच खूप उंचीवरच्या ठिकाणावरून खाली टाकतात. ते बाळ खाली त्याच्यासाठी धरलेल्या मोठ्या चादरीत पडतं. देवाची कृपा मिळवण्याचं कारण तेव्हा दिलं गेलं होतं, पण त्या बाळाचा पडताना जो थरकाप उडत असेल नी एवढ्या उंचीवरून चादरीवर आपटलं गेल्यानं जी शारीरिक आणि मानसिक हानी होत असेल, त्याचा तिथं कुणी विचारही करीत नाहीत. दुसऱ्या एका ठिकाणी लहान बाळांना मंदिर परिसरात जमिनीवर झोपवलं जातं व त्यांच्या अंगावर उकळती दुधाची खीर टाकली जाते. त्या क्षणाला ते मूल उठण्यासाठी धडपडतं, उपडं होतं नी त्याची भयंकर तडफड होते. ते पाहवतही नव्हतं. ह्या प्रकारामध्ये मुलांना कोणतीही शारीरिक इजा होत नसल्याचा दावा तिथले लोक करतात. त्यातलं खरं खोटं माहीत नाही. पण ह्या दोन्ही ठिकाणी

(पान ६ कॉलम ४ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) अॅड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणगी

✳ सौ. स्वाती आणि श्री. संदीप शरद देसाई यांजकडून त्यांची सुकन्या कु. दीप्ती संदीप देसाई हिच्या एमएस्सी (टेक्स्टाईल आणि क्लोथिंग) परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु. १,००१/-

✳ सौ. मोनिका सुबोध मानकर (मृत्यू: १६ मे, २०१२) यांच्या स्मरणार्थ श्री. मनीष सुबोध मानकर आणि सौ. मोनाली राजेश तळपदे यांजकडून रु. १००१/-

✳ श्री. उदय शंकर मानकर यांजकडून प्रभुतरुणाच्या दिवाळी अंकाकरिता रु. १००१/-

✳ सौ. निशा प्रदीप मानकरकडून चि. अमोल अनिरुद्ध कीर्तिकरच्या जन्माप्रीत्यर्थ रु. २५१/-

***चुकीची दुरुस्ती:-***

गतांकी (१) सौ. उर्मिला आणि श्री. उदय बा. जयकर यांजकडून रु. १००१/- तसेच (२) सौ. अदिती आणि डॉ. अनिकेत एन् तळपदे यांजकडून रु. ५००/- अशी प्रभुतरुणाच्या वर्धापनदिनासाठी देणगी वाचावी. छपाईत झालेल्या चुकीबद्दल दिलगीर आहोत. (३) 'प्रकाशातील परभू' या सदरात श्री. अमेय प्रभाकर यांची माहिती होती. त्यात Amey ऐवजी Ameya असे वाचावे. तसेच त्यांचे आजीआजोबा श्रीमती किकीबाय आणि श्री. माधव प्रभाकर यांच्या नावामागे Late असे कृपया वाचावे.

✳

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे शनिवार दि. ९ नोव्हेंबर, २०१३ रोजी दुपारी ३ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात , गायत्री मंदिराशेजारी, १२वा रस्ता, खार (प.) येथे पुढील स्पर्धा घेण्यात येतील. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी दुपारी २.३० वाजता येणे. या स्पर्धा फक्त महिला सभासदांसाठी आहेत.

१) **रांगोळी स्पर्धा:** महिलांसाठी (वेळ १ तास)
विषय: विविध फुलांसह फुलदाणी काढणे (माप २ फूट बाय २ फूट)
सूचना- खडू, पट्टी, ठिपक्यांचा कागद अशा कोणत्याही वस्तूंचा वापर करू नये, चित्रही नसावे.

२) **चित्रकला स्पर्धा!** मुलींसाठी (वेळ १ तास)
विषय: आयत्यावेळी दिलेले चित्र क्रेयॉन कलरने रंगविणे (अ गट ५ ते ८ वर्ष)
सूचना- कागद पुरविला जाईल. क्रेयॉन कलर घेऊन येणे.
विषय- फांदीवर बसलेले दोन पक्षी (ब गट ९ ते १५ वर्ष)
सूचना- कागद पुरविला जाईल. चित्रासाठी रंग, पेन्सिल घेऊन येणे.

३) **पाकसिद्धी स्पर्धा** महिलांसाठी
विषय: रंगीत ७ खाज्यांचा हार (घरून करून आणणे)
मुलींसाठी विषय: व्हेजिटेबल (सँडविच) कृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे.) (वेळ १ तास)

४) **फॅब्रिक पेंटिंग:** विषय (८ इंच बाय ८ इंच) मापाच्या चौकोनात रंगीबेरंगी फुलपाखरू काढणे.
सूचना- कलाकृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे (वेळ १ तास)

५) **कलाकौशल्य स्पर्धा:** विषय कलात्मक केशरचना करणे. (मॉडेल ज्याचे त्याने आणावे)
सूचना- कलाकृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे. (वेळ १ तास)

(समाजाच्या स्थापनादिनाचा अहवाल पुढील अंकी.)

✳

# प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१३-०६-१३ सौ. मोनिका आणि श्री. अनिरुद्ध मल्हारी कीर्तिकर, मुलगा, खार

### आत्याबाई नाव बोला

अमोल अनिरुद्ध कीर्तिकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ११-०९-१३ | श्री. शिरीष रमेश डी. राव | वय ५९, | लागोस |
| २४-०९-१३ | सौ. अनुजा आनंद तेंडोलकर (श्रीमती उषा आणि श्री. मुकुंद अजिक्य यांची कन्या) | | ब्रीच कँडी |
| २५-०९-१३ | लता मधुकर तळपदे | वय ७२ | बोरीवली |

(पान ४ कॉलम ४ वरून)

आमच्या ताईच्या लग्नानंतर म्हणजे सुरेशभाऊजींची आमच्या कुटुंबात एन्ट्री झाल्यानंतर आमच्या घरातील पुढील सर्व लग्ने त्यांच्या समर्थ देखरेखीखालीच झाली. अर्थात त्यांची मेहनतही असे. कारण कुठली वस्तू, कापडचोपड सर्वात चांगले व स्वस्त कुठे मिळते याची माहिती त्यांना होती. खरेदी करणे, जुन्या भांड्यांना पॉलिश करून घेणे वगैरे कामाला त्यांची सदैव तयारी असे. 'आपण ह्या घरचे जावई आहोत' असा तोरा त्यांनी कधीच मिरवला नाही. आमचे जवळचे सर्व नातेवाईक (माहेर/सासरचे) त्यांनी स्वत:च्या घरातले मानले. योग्य ती काटकसर करण्यात त्यांचा कल असे. चारचौघे जमल्यावर हंशाचा पाऊस पडत असे सुरेशभाऊजींमुळे.

भाऊजींना प्रवासाची, भटकंती करण्याची आवड होती. त्यांनी जवळजवळ पूर्ण भारतदर्शन केले होते. परदेशवारीसुद्धा झाली होती. सर्व टूर्स आम्ही स्वत: आखायचो. ठरलेल्या ठिकाणी पोहोचल्यावर हॉटेल शोधणे. थोडक्यात हॉटेलवाल्याला पटवणे यातसुद्धा त्यांचा हातखंडा होता. आम्ही बाकीजण सामान सांभाळत स्टेशनजवळ किंवा एस्.टी. स्टँडजवळ थांबायचो व हे दोन साडू त्यांच्या हॉटेल शोधमोहिमेवर. सुरेशभाऊजींना चांगले कपडे, टापटीपीने राहणे, उत्तम परफ्युम्सची आवड होती. मुलींसाठी कपडे आणायला ते गिरगावात जात. 'रजवाडी' दुकान मुलींच्या कपड्यांसाठी प्रसिद्ध होते. घरातील सर्वांच्या कपड्यांची खरेदी करत. त्यांची निवडसुद्धा चांगली असे.

आपण पाठारे प्रभु आहोत याचा त्यांना फार अभिमान होता. परभांच्या सर्व रीतीभातीची माहिती त्यांना होती. लग्नात साडे करण्यासाठी 'पडली' कोठे मिळेल यापासून ताशेवाल्यापर्यंत सर्व कामे ते सांभाळायचे. त्यामुळेच आम्ही त्यांना 'मॅनेजर' म्हणत असू. ते स्वत: उत्तम आर्टिस्ट होते. त्यांच्या घरी 'तांदळाचा गणपती' काढण्याची पद्धत होती. तो गणपती ठशाशिवाय उत्तम काढीत असत व त्यावर गंधाने नाक, डोळे व त्याची आयुधे काढीत. हा गणपती एक दिवसाचा असे व तो 'नवसाला पावतो' असा लोकांचा विश्वास होता.

संत तुकारामबुवांनी म्हटले आहे की, 'शेवटचा दीस गोड व्हावा'. कदाचित सुरेशभाऊजीसुद्धा गणपतीकडे हेच मागत असावेत. त्यामुळेच असेल की ऐन नवरात्रीत, त्यांच्या कुलस्वामीनीचे- श्री जोगेश्वरीचे दर्शन घेतल्यानंतर तिच्याच मंदिराबाहेर अतितीव्र हार्टअटॅकने त्यांना या जगातून मुक्ती मिळाली. असे मरण फक्त पुण्यवान माणसाच्या नशिबी येतं

अशा आमच्या सुरेशभाऊजींना आमची ही भावपूर्ण श्रद्धांजली.

(पान ५ कॉलम ४ वर)

अशिक्षितपणा खूप प्रमाणावर आढळून येतो. अशा भक्तांच्या विचारसरणीची खूप कीव येते नी त्यांच्यातल्या पदवीधरांचं शिक्षण फुकट गेल्याचं नी शिक्षणामुळे त्यांना चांगल्या विचारांची बैठक नी प्रगल्भता न लाभल्याचं बघून खूप वाईट वाटलं.

ऑक्टोबर महिन्यात येणाऱ्या दसऱ्याला वाईट विचार नी कृती ह्यांचं सीमोल्लंघन घडवून चांगल्या कृतीचं आयुष्यात आगमन घडवून सुविचारांचं सोनं लुटायला काय हरकत आहे?

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67